सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ करीता Tab.Pyridoxine खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-१०१८/प्र.क्र. ५२५/आ -७

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०००01.
दिनांक : १८ मार्च, २०१९.

वाचा :-

१) सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), मुंबई यांचे पत्र क्र. ससंआसे/ कुष्ठवक्षय/ कक्ष-औ. भां/पीआयपी १८-१९ /आरएनटीसीपी/ प्रशामान्यता/ १७४७३-७६, दिनांक २२ ऑक्टोबर, २०१८.

२) सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), मुंबई यांचे पत्र क्र. ससंआसे/ कुष्ठवक्षय/ कक्ष-औ. भां/१८/२२७४९, दिनांक ०७ डिसेंबर, २०१८.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत Isoniazid या औषधीचे दुष्परिणाम टाळण्यासाठी IPT समवेत द्यावयाच्या Tab. Pyridoxine २५mg खरेदी करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाकरीता पी आय पी अंतर्गत Isoniazid या औषधीचे दुष्परीणाम टाळण्यासाठी IPT समवेत द्यावयाच्या Tab. Pyridoxine २५mg खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेले एकूण रु. १०७.०० लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. सदर अनुदानापैकी Tab. Pyridoxine २५mg खरेदी करण्यासाठी रु. ११.२० लक्ष रकमेची निविदा प्रक्रिया करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्या संबंधिचा अनुदाना व खरेदीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

FMR code	Technical Specification of Tablet Pyridoxine 25 mg	Approx rate In Rs.	Total required quantity	App.Total Cost In Rs.
(6.2.14.2) PIP 2018-19 Procurement of Drugs	**Product Code 57** **A. Specific requirements** **Item:** **Product Code 57 (PC 57) consists of Pyridoxine (25 mg.) tablets. The drug contained in the product shall be currently registered in the country of manufacture and shall meet all requirements of the licensing authority of the country of manufacture.** **The drug contained in the product shall also be currently registered in India and shall meet all the requirements of the licensing authority in India.** **Description:** **Pyridoxine Tablets contained in blisters of the strip shall conform to the general requirements of Tablets and the requirements under individual monograph given in IP or other Pharmacopoeia of equivalent accuracy in case of international transactions.** **Pyridoxine Tablets contain Pyridoxine Hydrochloride.** **Each Tablet shall contain - Pyridoxine Hydrochloride IP 25 mg** **The quality of Pyridoxine Hydrochloride should conform to the requirements of the individual monograph given in IP or other Pharmacopoeia of equivalent accuracy in case of international transactions.** **B. Storage: As per applicable Pharmacopoeia.** **C. Shelf Life:** **Shelf life would be 36 months.** **Strip of 10 tablets.** **UOM of Measurement:- Tablet**	0.8	1400000	1120000
	Total Amount of Rs. (Rs.Elevan lacs Twenty thousand only)			**11,20,000**

२. प्रस्तुत प्रकरणी सहसंचालक, आरोग्य सेवा, (क्षयरोग व कुष्ठरोग), पुणे यांनी सादर केलेल्या वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने Tab. Pyridoxine २५mg खरेदी करण्याकरीता रु. ११.२० लक्ष च्या खरेदीकरीता FMR Code 6.2.14.2 या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीतून खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर Tab. Pyridoxine 25mg यांची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू Tab. Pyridoxine 25mg यांचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे

कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती अंतीम दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी व त्याबाबतचे संबंधितांकडून तसे प्रमाणपत्र घेण्यात यावे.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व व पुरवठयानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात आलेली आहे, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे, तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रमाच्या FMR Code 6.2.14.2 या लेखाशिर्षाखाली मंजुर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच, या बाबींच्या खरेदीची अन्य योजनेंतर्गत द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता कार्यक्रम प्रमुखांनी घ्यावी. तसे झाल्यास संबंधितांस यासाठी जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्याविरुध्द नियमानूसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१२) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी - २०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै,२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई व संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई आणि सदरहू कार्यक्रम राबविणाऱ्या कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 201903161711084217 असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH
MADHUKAR
FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.18 10:51:55 +05'30'

(निलेश फाळके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)